**MHRG170005572024**

विशेष विवाह अर्ज क्रमांक ९/२०२४

निशाणी क्र. ६० खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा सामनेवाला यांनी अर्जदार यांचा 'उलट तपास नाही' हा आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्र पाहिले. अर्जदार व सामनेवाला यांचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

३. अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्ज मंजूर करणेस हरकत नोंदविली.

४. अर्जदाराचा उलट तपास घेतला नाही म्हणून सदर साक्षीदाराचा 'उलट तपास नाही' असा आदेश दिनांक ०९/०३/२०२६ रोजी पारित करण्यात आला आहे. दिनांक २८/०२/२०२६ रोजी सामनेवाला यांचे वकिलांचे नातेवाईकाचा मृत्यू झाल्यामुळे त्यांना त्यांचे गावी सातारा येथे जावे लागले. त्यामुळे त्यांना अर्जदाराचा उलटतपास घेता आला नाही. तसेच सामनेवाला यांनी जाणीवपूर्वक अर्जदाराचा उलटतपास घेणेस विलंब केलेला नाही. अर्जदाराचा उलट तपास घेण्याची संधी न दिल्यास त्यांचे न्याय हक्कावर गदा येउ शकते. त्यामुळे अर्जदाराचा 'उलट तपास नाही' हा आदेश रद्द होउन सामनेवाला यांना सदर अर्जदाराची उलट तपासणी घेण्यास संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ अर्जदाराचा 'उलट तपास नाही' असा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SANTOSH RAMU CHAVAN Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN Date: 2026.03.30 16:56:25 +0530

पनवेल.
दिनांक ३०/०३/२०२६

( संतोष रा. चव्हाण )
जिल्हा न्यायाधीश-४
पनवेल रायगड.